## L. A. BILL No. IV OF 2022.

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.

## सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४.

**मुंबई महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ९ मार्च २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १० मार्च २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१८८८ चा ३. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक १७ फेब्रुवारी २०२२ रोजी, मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२२ हा प्रख्यापित केला होता ; २०२२ चा महा. अध्या २.

(शा.म.मु.) एचबी २६३६ (२५५–३-२०२२)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १७ फेब्रुवारी २०२२ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ यात कलम ६क समाविष्ट करणे.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) कलम ६ब नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १८८८ चा ३.

प्रशासकाची नियुक्ती.

"**६क.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य निवडणूक आयोगाने राज्य शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, राज्यातील कोविड-१९ च्या सार्वत्रिक साथरोगाच्या परिस्थितीमुळे महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक घेणे राज्य निवडणूक आयोगास शक्य होणार नाही, म्हणून, राज्य शासनास, **आदेशाद्वारे,** अधिनियमांतर्गत महानगरपालिकेच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी व सर्व कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नियुक्ती करता येईल :

परंतु, प्रशासक, महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर, पहिल्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीपर्यंत ते पद धारण करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या प्रशासकास, महानगरपालिका निधीतून राज्य शासन, वेळोवेळी, निर्धारित करील असे वेतन व भत्ते मिळतील.".

सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२२, हा याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२२ चा महा. अध्या. २.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश, यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**[ सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४. ]**

**[ मुंबई महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

[**श्री. एकनाथ शिंदे,**
नगर विकास मंत्री.]

**[ विधानसभेने दिनांक ९ मार्च २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक १० मार्च २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई